स्थायी समितीच्या **गुरुवार दिनांक 21–12–2017** रोजी **सायंकाळी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. संदिप चंद्रभान जाधव | सभापती |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 4. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 5. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 6. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 7. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 8. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 9. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 10. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 11. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 12. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 13. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 14. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 15. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त
3. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 309**ः– {लोककर्म झोन 9} प्रभाग क्र. 3 (क) अंतर्गत मॉ. बम्लेश्वरी नगर ते पिवळी नदी पर्यंत पावसाळी नालीचे बांधकाम करण्यास्तव प्राप्त निविदापैकी मे. उल्हास एंन्टरप्राजेस यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 49,99,895/– पेक्षा 13.24 टक्के कमी दराची रू. 43,37,909/–(रूपये त्रैचाळीस लक्ष सदतीस हजार नऊशे नऊ) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्र. 614 (A42401370826) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी पर्यंत सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 310ः–** {उद्यान विभाग} प्रभाग क्र. 07 (ड) ईंदोरा येथील सारीपुत्र बौध्द विहार मॉडेल टाऊन येथे उद्यान विकसित करण्याकरिता विविध कामे करण्याचे रू. 42,96,544/–( अक्षरी बेचाळीस लक्ष शहाण्णव हजार पाचशे चौरेचाळीस फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास तसेच या कामाच्या निविदा मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 311ः–** {जाहिरात विभाग} महानगरपालिकेतर्फे अनधिकृत जाहिरातीबाबत आकारण्यात येणारा दंड रु. १००/— ऐवजी वाढ करुन रु. २००/— करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 312ः–** {लोककर्म झोन क्र. 9} प्रभाग क्र. 3 (ड) अंतर्गत टिपु सुलतान चौक ते यशोधरा नगर चौक पर्यंत रस्त्यालगत ड्रेन लाईन टाकण्याच्या व फुटपाथ चे बांधकाम करण्याच्या रु. 49,99,653/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करून निविदा मागविण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

**ठराव क्रमांक 313ः–** Supply of Servers for eGovernance N. M.C., Nagpur.

{नगर यंत्री (ई–गव्ह.)} वरील कार्यासाठी प्रथम निविदा दि. 05/04/2017 रोजी प्रकाशित करण्यात आली होती. या निविदेमध्ये एकच निविदाकार आल्यामुळे 7 दिवसांची मुदतवाढ देण्यात आली होती. मुदतवाढ दिल्यानंतरही त्यामध्ये 2 निविदाकार आल्याने दि. 28/04/2017 रोजी दुसऱ्यांदा निविदा बोलविण्यात आली. त्यामध्ये 2 निविदाकारांची निविदा प्राप्त झाल्यामुळे मा. अति. आयुक्त-I यांच्या निर्देशानुसार या निविदेची तिसऱ्यांदा फेरनिविदा दि. 17/05/2017 रोजी बोलाविण्यात आली होती. तिसऱ्या निविदेबाबत निर्णय न झाल्यामुळे निविदेचा चौथा call दि. 08/11/2017 रोजी प्रकाशित करण्यात आला. दि. 24/11/2017 रोजी या निविदेची तांत्रिक निविदा उघडली असता, त्यामध्ये M/s Key Computers,Nagpur या एकाच निविदाकाराची निविदा प्राप्त झाली. तांत्रिक निविदा योग्य असल्यामुळे, दि. 29/11/2017 रोजी वित्तीय निविदा उघडण्यात आली. त्यामध्ये M/s Key Computers, Nagpur यांची रु. 36,48,270/- इतकी Bid प्राप्त झाली.

M/s Key Computers, Nagpur यांची प्राप्त झालेली वित्तीय निविदा प्राकलनीय राशी पेक्षा 60.61 % ने अधिक आहे व Govt. of India च्या e-Market Place (GEM) या पोर्टल वरील Servers च्या सध्याच्या दरांच्या राशी पेक्षा 6 % ने कमी आहे.

सबब M/s Key Computers, Nagpur यांची प्राकलनीय राशी पेक्षा 60.61 % ने जास्त असलेली परंतु, Govt. of India च्या Government e-Market Place (GEM) या पोर्टल वरील Server च्या सध्याच्या दरांच्या राशी पेक्षा 6 % ने कमी असलेली रु. 36,48,270 /- ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 314ः–** {विद्युत विभाग} धंतोली झोन क्र. ०४, प्रभाग क्र. ३५/ब मध्ये विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करण्याकरीता प्राकलनीय राशीपेक्षा १.११% ने कमी असलेली रु.२९,४२,५८९/- ची निम्नतम दराची में. अंसारी इलेक्ट्रिकल, नागपूर यांच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 315ः–** {शिक्षण विभाग} नागपूर महानगरपालिका संचालित प्राथ. व माध्य. शाळांमधील इयत्ता नर्सरी ते 12 वी मधील विद्यार्थ्यांना डी.बी.टी. प्रणालीचा वापर करुन (DBT Prepaid विद्याधन कार्डद्वारा) स्वेटर देण्यास्तव मंजुरी देवून दुर्बल घटक

समिती अंतर्गत असणारे पद क्र. ए2740202070, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गणवेष अंतर्गत रु. 25 लक्ष व शिक्षण विभागाकडील पद क्र. ए25002020705 विद्यार्थ्यांना गणवेष मध्ये उर्वरित रु. 41,14,880/– असा एकत्रित रु. 66,14,800/– एकत्र निधी स्वेटर खरेदी करण्यास्तव मंजुरी देण्याबाबत व डी.बी.टी. प्रणाली अंतर्गत खरेदी करावयाची असल्यामुळे गणवेष व तत्सम साहित्य खरेदीकरिता बँक ऑफ महाराष्ट्र येथे काढण्यात आलेल्या खाते क्र. 60290288010, NMC Education School Uniform 2017 येथे उपरोक्त संपूर्ण रक्कम वित्त विभागाद्वारा जमा करणे. यासोबतच विद्यार्थ्यांनी स्वेटर खरेदी करावे, याकरिता शिक्षण विभाग नमुना स्विकृती समितीद्वारा स्विकृत स्वेटरच्या नमुन्याचे आधारे स्वेटरचे निम्नतम दर निश्चित करण्यास व ई–निविदा प्रक्रियेद्वारा प्राप्त निम्नतम दर, प्रस्तुत निम्नतम दराचे आधारे 3 किंवा अधिक पुरवठादारांचे डी.बी.टी. प्रणालीचा वापर करुन स्वेटर पुरवठा करण्यास पुरवठादारांचे पॅनल नेमणे, याकरता ई–निविदा प्रक्रिया राबविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 316ः–</u> {क्रीडा व सांस्कृतिक वि.} नागपूर महानगरपालिका तर्फे "महापौर चषक" अखिल भारतीय कबड्डी स्पर्धाचे (पुरूष/महिला) आयोजन मार्च २०१८ मध्ये "रा. पै. समर्थ स्टेडियम" येथील मैदानावर करण्यात येणार आहे. या स्पर्धाकरीता प्राकलन नुसार रू. ३६,९२,५००/– खर्च अपेक्षित आहे.

खेळाडू निवास व्यवस्था "आमदार निवास" येथे करण्यात येणार असून या ठिकाणी इतरत्र कॅटरर्स द्वारा भोजन व्यवस्था करता येत नसल्यामुळे खेळाडू भोजन व्यवस्था आमदार निवास कॅन्टीन कडून त्यांचे दर मागवून वाटाघाटी करून करावी लागेल.

करीता, उपरोक्त प्रस्ताव वित्तीय तथा प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 317ः–</u> {जन्म मृत्यु विभाग} नागपूर महानगरपालिके तर्फे नागरिकांना निर्गमित करण्यात येणारा जन्म–मृत्यु दाखला हा मुळ अभिलेख असून या दाखल्यांचा वारंवार वापर होतो. म्हणून दीर्घकाळ टिकणारा गुणवत्तापूर्ण प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे खालील नमुद विशिष्ट दर्जाच्या कागदांची खरेदी करण्याकरिता सन 2017–2018 च्या आय व्ययकातील पद क्रमांक A20100120214 प्रिंटेड स्टेशनरी या व्यय शिर्षातून वार्षीक खर्च अंदाजे रू. 67,20,000/– इतका राहील.

सदर निविदा कालावधीत महिन्याला अंदाजे 35,000 कागदे वापरण्यात येत होती. सध्या जन्म–मृत्यु दाखल्याच्या मागणीत वाढ लक्षात घेता महिन्याला अंदाजे 40,000 कागदे वापरण्यात येवू शकतात. त्यानुसार वार्षिक उपयोगात येणाऱ्या कागदांची संख्या अंदाजे 40,000 x 12 महिने = 4,80,000 अपेक्षित असून माहे जुलै 2017 पासून जी.एस.टी. लागु झालेली आहे व कागदाकरिता 18 टक्के दर निश्चित केलेले आहे. तसेच मुल्य वृध्दीचा विचार केला असता कागदाच्या दरात वृध्दीची शक्यता राहील. यास्तव बाजार भावाची चाचपणी करण्याकरिता या क्षेत्रात काम करणाऱ्या तीन पूरवठादारांकडून अपेक्षित कामाचे मुख्य कथने मागविण्यात आली असून माझे समक्ष उघडण्यात आली व त्यात नमूद दर पुढील प्रमाणे आहेत 1) रू. 14.00/– 2) रू. 15.90/– व 3) रू. 16.00. पैकी निम्नतम दर रू. 14.00/– इतके प्राप्त झालेले आहे. प्रस्तूत निम्नतमदरास आधारभूत माणून निविदेची अपेक्षित मुल्य निश्चित करणे योग्य राहील. या प्रमाणे गुणांकन केले असता वार्षिक 4,80,000 कागदाकरिता x निम्नतम दर रू. 14.00 = रू. 67,20,000/– या प्रमाणे एकूण तीन वर्षाकरिता अपेक्षित खर्च 67,20,000 x 3 = रू. 2,01,60,000/– इतका राहील. खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचा आणि ही खरेदी, निविदा बोलावून करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 318ः—** मौजा माऊलीनगर, नरसाळा येथील रस्त्याचे बांधकाम व
**{स्लम विभाग}** डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त एकुण 05 निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. गुप्ता कन्स्ट्रक्शन, यांची प्राकलनीय दरापेक्षा 10.04 टक्के कमीवर असलेली रूपये 77,80,659/— (रूपये सत्यात्तर लक्ष, अंशी हजार सहाशे एकोनसाठ फक्त) ची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा तसेच या कामाचा खर्च लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रस्तावित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

**ठराव क्रमांक 319ः—** प्रभाग क्र. 26 — क अंतर्गत श्रीकृष्ण नगर येथील खरबी रोड
**{लोककर्म झोन क्र. 5}** ते भारतीय विद्या भवन पयर्तं सिमेंट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव रूपये 50,00,000/— च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

**ठराव क्रमांक 320ः—** मौजा प्रभातनगर, नरसाळा येथील रस्त्याचे बांधकाम व
**{स्लम विभाग}** डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त एकुण 05 निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. गुप्ता कन्स्ट्रक्शन, यांची प्राकलनीय दरापेक्षा 10.03 टक्के कमीवर असलेली रूपये 60,60,458/— (रूपये साठ लक्ष, साठ हजार चारशे अठ्ठावन फक्त) ची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच या कामाचा खर्च लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रस्तावित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 321ः—** उपरोक्त विषयाचे अनुषंगाने प्रवर्तन विभागामार्फत नागपूर
**{प्रवर्तन विभाग}** महानगरपालिकेच्या 10 ही क्षेत्रिय कार्यालयांतर्गत मासिक वेळापत्रकानुसार फुटपाथ/रोड स्लोपवरील दुकानदार, व्यावसायिक यांचे अतिक्रमण निर्मुलनाची कारवाई करण्यात येते. कारवाई दरम्यान जप्त करण्यात आलेले सामान/साहित्य परत मागण्याकरिता अतिक्रमणधारक विभागामध्ये अर्ज सादर करीत असतात. अशा स्थितीमध्ये अतिक्रमण निर्मुलन कार्यवाहीमध्ये जप्त केलेल्या सामान/साहित्याच्या किंमतीचा स्पष्ट बोध होत नसल्यामुळे सामान/साहित्याच्या अंदाजे रक्कमेवरुन सामान/साहित्य परत करण्यात येते.

तसेच बहुतांश वेळेस अतिक्रमण निर्मुलन कार्यवाही दरम्यान दुचाकी/चारचाकी हलके वाहन व चारचाकी जड वाहन विभागामार्फत गाडी/वाहनाचा वापर करुन व्यवसाय करणाऱ्या अतिक्रमण धारकांवर कारवाई करुन गाडी/वाहन जप्त करण्यात येते. गाडी/वाहनांच्या किंमतीच्या 25% टक्के दंड आकारल्यास अतिक्रमण धारकांना अतिरिक्त प्रमाणात दंड भरावा लागतो.

त्याकरिता गाडयांचा वापर करुन फुटपाथ/रोडस्लोपवर अतिक्रमण धारकांकडुन भरणा करावयाची दंडनीय रक्कम खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | गॅगखर्च/दंडनीय रक्कम |
|---|---|---|
| 1. | दुचाकी वाहन | रु. 1000/— ते रु. 2000/— |
| 2. | तीनचाकी वाहन | रु. 2000/— ते रु. 3000/— |
| 3. | चारचाकी हलके वाहन | रु. 3000/— ते रु. 5000/— |
| 4. | चारचाकी जड वाहन | रु. 5000/— ते रु. 7000/— |

करीता उपरोक्त प्रमाणे जप्त करण्यात येणाऱ्या दुचाकी वाहन/चारचाकी हलके वाहन व चारचाकी जड वाहन परत करण्याकरिता गॅगखर्चाचा भरणा करण्याचे मंजुरीस्तव सादर प्रस्तुत. उपरोक्त राशी प्रशासकीय शुल्क म्हणून घेण्याचे प्रस्ताव मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन, स्थायी समिती द्वारे .

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | गॅगखर्च/दंडनीय रक्कम |
|---|---|---|
| 1. | दुचाकी वाहन | रु. 500/— ते रु. 1000/— |
| 2. | तीनचाकी वाहन | रु. 1000/— ते रु. 2000/— |
| 3. | चारचाकी हलके वाहन | रु. 1500/— ते रु. 3000/— |
| 4. | चारचाकी जड वाहन | रु. 3000/— ते रु. 5000/— |

या दुरुस्तीसह व सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 322:—**
**{स्लम विभाग}**
मौजा गोविंदनगर, नरसाळा येथील रस्त्याचे बांधकाम व डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त एकुण 04 निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. श्री. गणेश लॅन्ड डेव्हेलोपर्स ॲन्ड कन्स्ट्रक्शन कंपनी, यांची प्राकलनीय दरापेक्षा 6.30 टक्के कमीवर असलेली रूपये 52,76,952/— (रूपये बावन लक्ष, छयात्तर हजार नऊशे बावन फक्त) ची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच,

या कामाचा खर्च लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रस्तावित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 323:—**
**{लोककर्म झोन क्र. 5}**
प्रभाग क्र. 27 — ब अंतर्गत गुरूदेव नगर व बापू नगर, कबीर नगर येथील रोडचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रूपये 38,00,850/— च्या प्राकलनास वित्तीय तरतुद मुक्त करण्याकरीता, प्रशासकिय मान्यता व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 324:—**
**{लोककर्म झोन 09}**
प्रभाग क्र. 3 (ब) अंतर्गत विनोबा भावे नगर येथील गल्ली नं. 29,31 आणि वनदेवी नगर येथे सिमेंट कॉक्रीट पेव्हमेंट व ड्रेन लाईनचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. उल्हास इंन्टरप्राजेस यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 29,98,919/— पेक्षा 16.26 टक्के कमी दराची रू. 25,11,175/—(रूपये पंचवीस लक्ष अकरा हजार एकशे पंच्याहत्रर) ची निविदा स्विकृत करण्याचा तसेच हे काम पद क्र. 681(A22001330802) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी पर्यंत सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 325:—**
**{स्लम विभाग}**
मौजा सुदर्शन नगर, नरसाळा येथील रस्त्याचे बांधकाम व डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त एकुण 04 निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. श्री. गणेश लॅन्ड डेव्हेलोपर्स ॲन्ड कन्स्ट्रक्शन कंपनी, यांची प्राकलनीय दरापेक्षा 6.32 टक्के कमीवर असलेली रूपये 34,57,768/— (रूपये चौतीस लक्ष, सत्तावन हजार सातशे अडुसष्ठ फक्त) ची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच,

या कामाचा खर्च लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रस्तावित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 326:—**
**{लोककर्म झोन क्र. 5}**
प्रभाग क्र. 27 — अ अंतर्गत नंदनवन झोपडपट्टी येथील श्री ढोके ते श्री लारोकर यांचे घरापर्यंत सी. सी. रोडचे काम

करण्याच्या कामास्तव रूपये 34,54,350/— च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

**ठराव क्रमांक 327ः—** प्रभाग क्र. 3 (क) अंतर्गत पिवळी नदी हमीद नगर
**{लोककर्म झोन 09}** (मॉ बम्लेश्वरीनगर) येथे सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्यास्तव रु. 49,99,984/— रकमेच्या प्राकलनास मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 328ः—** महानगरपालिका यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात
**{लोककर्म झोन 03}** नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य योजने अंतर्गत मौजा— हुडकेश्वर (बु.) प.ह. ३७ येथील स्मशान भूमीचा विकास (स्थापत्य स्वरूपाची कामे) करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण तीन निविदाकाराची निविदांपैकी मे. एम. डी. कंन्स्ट्रक्शन यांची प्राक्कलनीय दरापेक्षा ११.०० टक्के कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. १,१०,६९,४६६/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 329ः—** मे. सायबरटेक सिस्टिम्स ॲन्ड सॉफ्टवेअर लिमिटेड व्दारा
**{कर विभाग}** कार्यादेश क्र. 271/AD/2015 दिनांक 06.11.2015 अंतर्गत करण्यात येत असलेल्या नागपूर महानगरपालिका सीमेतील हाऊस युनिटच्या सर्वेक्षणाचा अहवाल स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्याचे निर्देश स्थायी समिती ठराव क्र. 104 दिनांक 07.07.2017 अन्वये आहेत. हया अनुषंगाने अहवाल पूढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे दिनांक 26.09.2017. ते 27.11.2017 रोजी पर्यंत मे. सायबरटेक सिस्टिम्स ॲन्ड सॉफ्टवेअर लिमिटेड व्दारा सर्वेक्षणात data collect करण्यात आलेल्या हाऊस युनिटची संख्या 120143 असून 138759 हाऊस युनिटचा data QC (Quality Check) करून संबंधित Assessing Authority Approval करीता Forward केलेला आहे. 138759 हाऊस युनिट पैकी संबंधित Assessing Authority व्दारा 116229 हाऊस युनिट चा data approved झालेला आहे. 13076 हाऊस युनिटचा data बाबत प्रत्यक्ष संयुक्त मौक्का चौकशी करून माहिती तपासणी करून घेणे करीता Rework साठी परत करण्यात आलेला आहे. Approved 120642 हाऊस युनिट करीता ठराव क्र. 72 दिनांक 04.03.2015 च्या मंजूर पध्दतीन्वये करयोग्य मुल्य निश्चित करून कर निर्धारण पुस्तक नागरिकांना बघण्यासाठी संबंधित झोन कार्यालयात ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन, 31 डिसेंबर पर्यंत सर्वेक्षण करण्याचे निर्देश विभागाने द्यावे, माहितीची समितीने नोंद घेतली.

**ठराव क्रमांक 330ः—** प्रभाग क्र. 20 (ड) मधील नाईक तलावाचे सौदर्यीकरण
**{लोककर्म झोन 07}** करण्याच्या कामाकरिता रु.74,99,787/— रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून निविदा मागविण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 331ः—** नागपूर महानगरपालिकेव्दारे जी.एम.बनातवाला इंग्रजी उच्च
**{शिक्षण विभाग}** प्राथ. शाळा घरमालक श्री. मुश्ताक अहमद हिदायतुल्ला व श्रीमती रजीया बानो मुश्ताक अहमद यांचे कडून इमारत शाळेकरितादि. 26.06.2009 पासून किरायाने सुरू केली असून सद्यःस्थितीत त्यांचे एकूण 14 वर्गखोल्यांचे दरमहा भाडे रू. 50,650/— असून उपअभियंता, झोन क्र. 9, आशीनगर, मनपा नागपूर यांनी एकूण 17 खोल्यांचे दरमहा भाडे दि. 22.12.2016 पासून पुढील एक वर्षाकरिता मासिक भाडे फेर

मुल्यांकन करून झोन अंतर्गत निश्चित केले आहे. मालमत्ताधारक श्री. मुश्ताक अहमद हिदायतुल्ला व श्रीमती रजिया बानो मुश्ताक अहमद यांनी निश्चित केलेले दरमहा भाडे प्रदान करावयाचे आहे.

उपअभियंता, झोन क्र. 9, आशीनगर, मनपा नागपूर यांनी दरमहा निश्चित केलेले भाडे रू. 50,650/— याप्रमाणे दि. 22.12.2016 पासून पुढील 1 वर्षाकरिता (दि. 21.12.2017 पावेतो) घरमालकास देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 332</u>:—** महानगरपालिका यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात **{लोककर्म झोन 03}** नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य योजने अंतर्गत मौजा— नरसाळा येथील स्मशान भूमीचा विकास (स्थापत्य स्वरूपाची कामे) करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण तीन निविदाकाराची निविदांपैकी मे. एम. डी. कंन्स्ट्रक्शन यांची प्राक्कलनीय दरापेक्षा ११.०० टक्के कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. १,१२,४७,९२२/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

**<u>ठराव क्रमांक 333</u>:—** प्रभाग क्र. 3 (क) (जुना 3—ब) अंतर्गत मॉ. बम्लेश्वरी नगर **{लोककर्म झोन 9}** धम्मानंद नगर येथे सीमेंट कॉक्रीट पेव्हमेंट चे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. उल्हास इंन्टरप्राजेस यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 49,99,992/— पेक्षा 17.75 टक्के कमी दराची रू. 41,12,493/—(रूपये एकेचाळीस लक्ष बारा हजार चारशे त्र्यानन्व) ची निविदा स्विकृत करण्याचा तसेच, हे काम पद क्र. 679 (A42001470511) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी पर्यंत सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 334</u>:—** मनपा हॉट मिक्स प्लॅन्ट हिंगणा परीसरातील भंगार साहित्य, **{हॉटमिक्स प्लॅन्ट विभाग}** मशिनरी, टायर, ड्रम्स इत्यादी करीता प्राप्त निविदांमधील खालील प्रमाणे सहभागी पात्र निविदाकारांच्या बाबनिहाय महत्तम दरांना मान्यता देवून त्या दरांवर संबधीत बाबी खालील विहीत साहित्य विक्री करण्यास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

| sn | Name of Work | Qty. | Offset Price Rate | Highest Bid Rate | Highest Bid Tenderer |
|---|---|---|---|---|---|
| A | Old Hot mix plant with its all accessories (10 tones approx) | 1 lot | Rs.1,25,000/- | Rs. 4,51,786/- | ZAHID TRADING CO |
| B | 1)Old m.s.shade(15000kg.approx)<br>2)Building material including m.s. angles,m.s.pipe,iron grill, gate,sheet,etc(12000kg.approx) | 15000 Kg<br>12000 Kg | Rs. 10/- per kg<br>Rs. 10/- per kg | Rs. 21/- per kg<br>Rs. 38.18/- per kg | ZAHID TRADING CO<br>OHAD STEEL |
| C | 1) F.E. Loader machine make HM<br>2) Old steam Roller(antique) | 01 No.<br>01 No. | Rs. 1,00,000/-<br>Rs. 1,00,000/- | Rs. 1,75,786/-<br>Rs. 2,88,444/- | ZAHID TRADING CO<br>OHAD STEEL |
| D | Vehicle / Machine scrap parts (11000kg.approx) | 11000 Kg. | Rs. 14/- per kg | Rs. 20.75/- per kg | NASIBDAR MUSAHIB & CO |
| E | Tyre,Tubes<br>Size 10.00x20 -125 No.<br>Size 12.5 x18 - 07 No.<br>Size 7.00 x16 - 04 No.<br>Total- 147 No.<br>(3500kg.approx) | 3500 Kg | Rs. 3/- per kg | Rs. 49/- per kg | BANSILAL AND SONS |
| F | 1)M.S.Drum.<br>2)Plastic Drum | 125 No<br>2400 No. | Rs. 40/- each<br>Rs. 70/- each | Rs. 208/- each<br>Rs. 350/- each | OHAD STEEL<br>ZAHID TRADING CO |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| G | Iron water tanks (02 No.) | 1 lot | Rs. 25,000/- | Rs. 51,888/- | OHAD STEEL |

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 335ः—** {सा.प्र. विभाग} नागपुर महानगर पालिकाचे विविध विभाग व क्षेत्रीय कार्यालयामध्ये असलेली मालमत्ता व इमारतीचे परिसरातील देखरेख व सुरक्षेच्या दृष्टीने कार्यरत खाजगी सुरक्षा रक्षक ऐजन्सीचा कंत्राट संपुष्टात आल्यानंतर मा.स्थायी समिती कडून निविदा प्रक्रीया पुर्ण होईपर्यत मुदतवाढीस मान्यता प्रदान केली असून एक वर्षाचे कालावधीकरीता शासनाचे किमान वेतन व इतर लागु असलेले भत्ते व शासनातर्फे वेळोवेळी होणारी वाढ (स्थानीक स्वराज्य संस्थेला लागु असलेले (विशेष भत्ता)) मिळून कंत्राटी तत्वावर खाजगी ऐजन्सीकडून ऑनलाईन वेबसाईट https://mahatenders.gov.in वर स्थायी समिती ठराव क्र. 126, दि 04.08.2017 अन्वये निविदा बोलविण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने निविदेमध्ये एकुण 10 निविदाकारांनी भाग घेतला असून यापैकी 06 निविदाकार अपात्र ठरले व उर्वरीत खालील चार ऐजन्सी पात्र ठरलेले आहेत. या पात्र निविदाकारांची दरपत्रक (Price Bid) उघडले असता चारही पात्र निविदा कारांचे प्रतिमाह प्रति सुरक्षा रक्षक दर रू 18591.71/— इतके आहेत.

1) सुपर सिक्युरीटी सर्व्हीसेस, नागपुर
2) इंन्डस्ट्रीयल सिक्युरीटी सर्व्हीसेस, नागपुर
3) किशोर ऐजंन्सीज, नागपुर
4) युनीटी सिक्युरीटी फोर्स ॲन्ड ट्रेनींग इन्स्टीटयुट, नागपुर

करीता उपरोक्त चार ऐजन्सींना एक वर्षाचे कालावधीकरीता शासनाचे किमान वेतन दरानुसार कंत्राटी तत्वावर सुरक्षा रक्षकाची सेवा घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 336ः—** {स्लम विभाग} मौजा स्वागतनगर, यशनगर, संभाजीनगर, नरसाळा येथील रस्त्याचे बांधकाम व डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त एकुण 05 निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. शांती इंटरप्राईजेस, यांची प्राकलनीय दरापेक्षा 10.50 टक्के कमीवर असलेली रूपये 68,53,362/— (रूपये अडुसष्ट लक्ष, त्रैपन्न हजार तिनशे बासष्ट फक्त) ची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच,

या कामाचा खर्च लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रस्तावित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 337ः—** {लोककर्म विभाग} प्रभाग क्र. 27 अंतर्गत सरदार पटेल चौक ते मोक्षधाम घाटाकडे जाणा—या रस्त्यावरिल नागनदीवर मोठया पुलाचे बांधकामाचे रूपये 57495079 रक्कमेच्या स्थापत्य स्वरूपाच्या प्राकलनास मा. स्थायी समिती ठराव क्रमांक 320 दिनांक 09/12/2014 अन्वये प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे.

स्थायी समिती ठराव क्रमांक 342 दिनांक 17/12/2015 अन्वये में. अबरार अहमद यांची (सन 2013—14 चे दर सूची प्रमाणे) प्राकलनीय दरापेक्षा 7.86 टक्के अधिक दराची निम्नतम निविदेस मंजुरी प्राप्त आहे. त्यानुसार कंत्राटदारास कार्यादेश निर्गमित करण्यात आला आहे.

उपरोक्त पुलाचे डिझाईन हे Single Span चे होते. परंतु Single Span मुळे High Flood Level व पुलाची उंची हयांचा समन्वय साधता येत नसल्यामुळे मा. मुख्य अभियंता मनपा यांच्या निर्देशानुसार VNIT कडून Hydrauic design तयार करून Two Span Bridge चे Drawing तयार करण्यात आले. जेणे करून High Flood Level व पुलाची उंची यांचा समन्वय साधून सुधारीत Drawing VNIT कडून मंजुर करून घेण्यात आले.

सुधारीत Drawing मध्ये एक ऐवजी दोन Span चे नियोजन करण्यात आले. जेणे करून भविष्यातील नागनदी अभियाना अंतर्गत जलवाहतुक करण्यासाठी आवश्यक उंची (पाण्याची पातळी व पुलाच्या स्लॅबचे तळ यातील अंतर) साधता आली असून त्यामुळे कामाचे स्वरूप वाढले

तसेच जुन्या पुलावर अस्तीत्वात असलेल्या 600 mm dia च्या दोन जलवाहीन्या प्रस्तावित पुलाच्या दोन्ही बाजुला लोखंडी पुल तयार करून स्थालांतरीत करण्याचे काम, तसेच पुलाच्या चारही बाजुंनी सुरक्षा भिंतीचे काम समाविष्ठ आहे.

VNIT कडून मंजुर Drawing नुसार जुन्या C.S.R. (सन 2013–14 चे दर सुचीप्रमाणे) रूपये 102367884 रकमेचे सुधारीत प्राकलन तयार करण्यात आले.

सदर सुधारीत प्राकलनास मा. मुख्य अभियंता म.न.पा. नागपूर यांनी 52/CE/2017-18 दिनांक 27/10/2017 अन्वये तांत्रीक मान्यता प्रदान केली आहे. तसेच कंत्राटदाराने वाढीव कामे निविदेच्या जुन्याच दराने करण्याचे सहंमती पत्र दिले आहे.

प्रभाग क्र. 27 अंतर्गत सरदार पटेल चौक ते मोक्षधाम घाटाकडे जाणा–या रस्त्यावरिल नागनदीवर मोठया पुलाचे बांधकामाचे रूपये 10,23,67,884/– रक्कमेची सुधारीत प्राकालनास तसेच या कामाचे कंत्राटदार में. अबरार अहमद यांना मंजुर निविदा दराने ( सन 2012–13) वाढीव कामाचा रूपये 4,48,72,805/– रक्कमेचा कार्यादेश निर्गमीत करणे तसेच पद क्रमांक 678(A42101370616) अंतर्गत तरतूद उपलब्ध करून देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 338:–</u> प्रभाग क्र ११(क) अंतर्गत मानकापुर घाट येथे बर्नींग शेड,
{लोककर्म झोन 10} आय ब्लॉक व पावसाळी नालीचे बांधकामास्तव रू. ३५,९३,००५/– (पस्तीस लक्ष त्र्यांनव हजार पांच रूपये फक्त ) रक्कमेच्या प्राकलणास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न तसेच नविन पद क्र. A२३५०११३०८०७ (जुने पद क्रमांक २५३) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न तसेच या कामास्तव म.न.पा. मध्ये नोंदणीकृत प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार मे. विघ्नहर्ता कंन्सलटींग इंजिनीयर यांची मनपाच्या मंजुर दरावर नेमणुक करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 339</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर

<u>स्थायी समिति सभा विषय/ठराव क्र.          दि. 29.11.2017 (उपसमितीचा अहवाल व परिशिष्ट 'अ')</u>